




# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# माहिती पत्रक


**नोंदणीकृत कार्यालय**

२ मजला, ठाकरसी हाऊस, विदेशी टपाल कार्यालयाजवळ,
शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी : (०२२) २२०२३७९१   फॅक्स : (०२२) २२०२३७९१

**मुख्य कार्यालय**

एन-१, जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड क्र. ९,
जे. व्ही. पी. डी. स्कीम, जुहू, मुंबई - ४०००४९.
दूरध्वनी : २६२०२८५२/२६२००३५१   फॅक्स : (०२२) २६७०५१७३

**Email : info@mpbcdc.in**
**Official Website : www.mpbcdc.maharashtra.gov.in**
**Online Request: www.nbrmahapreit.in**




**श्री. एकनाथ शिंदे**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**श्री. अजित पवार**
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

अनुसूचित जाती व नवबौद्ध लोकांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने १० जुलै, १९७८ रोजी महामंडळाची स्थापना केली. हे महामंडळ महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत कार्यरत आहे. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल १००० कोटी रुपयाचे असून ५१% भागभांडवल राज्य शासन व ४९% भागभांडवल केंद्र शासनाचे आहे. महामंडळ केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजना राबवित असून, महामंडळाला निधी राज्यशासन व केंद्र शासनकडून प्राप्त होतो. महामंडळाचे मुख्यालय मुंबई येथे असून सर्व जिल्ह्यात जिल्हा कार्यालये व विभागीय स्तरावर प्रादेशिक कार्यालये कार्यरत आहेत.

## महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना

### – राज्य शासनाच्या योजना –

### १) ५०% अनुदान योजना–

१) प्रकल्प मर्यादा रु. ५०,०००/– पर्यंत

२) प्रकल्प मर्यादेच्या ५०% किंवा जास्तीत जास्त १०,०००/– पर्यत अनुदान देण्यात येते व उर्वरीत रक्कम बँकेमार्फत देण्यात येते. बँक कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे ३ वर्षात करावयाची आहे.

### २) प्रशिक्षण योजना –

अनुसूचित जातीच्या लाभधारकांना व्यवसायासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधीत तांत्रिक व्यवसाय सुरु करण्याकरिता विविध व्यवसायिक ट्रेडचे शासनमान्य संस्थामार्फत, (३ महिने ते ६ महिने पर्यत) मोफत प्रशिक्षण देण्यात येते. उदा. शिवणकला, ब्युटीपार्लर, इलेक्ट्रीक वायरमन, टर्नर/फिटर, रेफ्रिजरेशन ॲण्ड एअर कंडीशनिंग, मशिनवर स्वेटर विणणे, खेळणी बनविणे, नळ जोडणी, टी. व्ही. रेडीओ / टेपरेकॉर्डर, मॅकॅनिक, संगणक प्रशिक्षण, मोटार वाईडींग, फॅब्रिकेटर/वेल्डींग, ऑटोमोबाईल रिपेरिंग (टु, थ्री, फोर व्हीलर) पेंटीग (ऑटोमोबाईल्स), मशरुम, वाहनचालक, चर्मोद्योग, घड्याळ दुरुस्ती, फोटोग्राफी, कंपोझींग, बुक बायडींग, सुतार काम, मोबाईल दुरुस्ती इत्यादी.

**प्रशिक्षणार्थींना खालील प्रमाणे मासिक विद्यावेतन देण्यात येते.**

(१) स्थानिक प्रशिक्षणार्थ्यांस रु. ३००/– प्रति महिना

(२) महानगरपालिका क्षेत्रात रु. ५००/– प्रति महिना

(३) प्रशिक्षण प्रशिक्षणार्थीच्या जिल्ह्याबाहेर असल्यास रु. ६००/– प्रति महिना प्रशिक्षणार्थीस विद्यावेतन देण्यात येते.

(४) प्रशिक्षण फी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना महामंडळामार्फत देण्यात येते.

### ३) बीजभांडवल योजना–

महात्मा फुले महामंडळास प्राप्त होणाऱ्या भाग भांडवलामधून बीजभांडवल योजना राबविण्यात येते. योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

(१) प्रकल्प मर्यादा रु. ५०,००१/– ते रु. ५ लाखापर्यंत.

(२) प्रकल्प मर्यादेच्या २०% बीजभांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ % द. सा. द. शे. व्याज दराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. १०,०००/– चा समावेश आहे.

(३) बँकेचे कर्ज ७५% देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज दर आकारण्यात येतो.

(४) महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवून दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार ३ ते ५ वर्षाचे आत करावी लागते.

(५) अर्जदारास ५ % स्वत:चा सहभाग भरावयाचा आहे.

## – केंद्रीय महामंडळाच्या योजना –

### ४) राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना (एन. एस. एफ. डी. सी.)

केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळाची स्थापना केलेली असून या महामंडळाचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे कार्यरत आहे. सदर महामंडळाच्या योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याकरिता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची वाहिनीकृत यत्रंणा म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. केंद्रीय महामंडळाच्या योजनेचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

#### अ) मुदती कर्ज योजना –

अ) प्रकल्प मर्यादा रु. ५.०० लाख

ब) एनएसएफडीसी यांच्या मुदती कर्जामध्ये महामंडळाकडून २०% बीजभांडवल ४% व्याजदराने दिले जाते त्यामध्ये रु. १०,०००/– पर्यंत अनुदानाचाही सामावेश आहे.

क) अर्जदाराचा सहभाग ५% असतो.

ड) एनएसएफडीसीच्या कर्जावर ६% व्याजदर आकारण्यात येतो.

इ) कर्जाची परतफेड ५ वर्षात मासिक समान हफ्त्यांत करावयाची आहे.

उ) एकूण तरतुदीच्या १०% रक्कम रु.५ लाखा पुढील व रु. ३० लाखापर्यंतच्या प्रकल्पासाठी उपयोग केला जातो व त्यावर ८% व्याज आकारले जाते.

#### ब) सुक्ष्मयत पुरवठा योजना – (MCF)

- प्रकल्प मर्यादा रु.१,४०,०००/– इतका आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ७५% असून ५% व्याज दराने दिले जाते.
- महामंडळाकडून प्रकल्प मर्यादेच्या २०% बीजभांडवल असून त्यावर ४% व्याज दर आकारले जाते व त्यामध्ये रु. १०,०००/– अनुदानाचा समावेश आहे.
- अर्जदाराचा सहभाग प्रकल्प मर्यादेच्या ५% आहे.
- कर्जाची परतफेड ३ वर्षामध्ये मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

#### क) महिला समृद्धी योजना– (MSY)

- प्रकल्प मर्यादा रु. १,४०,०००/– आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ७५% असून ४% व्याज दराने दिले जाते.
- महामंडळाकडून प्रकल्प मर्यादेच्या २०% बीजभांडवल असून त्यावर ४% व्याजदर आकारले जाते व त्यामध्ये रु. १०,०००/– अनुदानाचा सामावेश आहे.
- अर्जदाराचा सहभाग प्रकल्प मर्यादेच्या ५% आहे.
- कर्जाची परतफेड ३ वर्षामध्ये मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

#### ड) महिला अधिकारिता योजना –(MAY)

- प्रकल्प मर्यादा रु.५,००,०००/– आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ७५% असून ५.५% व्याज दराने दिले जाते.
- महामंडळाकडून प्रकल्प मर्यादेच्या २०% बीजभांडवल असून त्यावर ४% टक्के व्याज दर आकारले जाते व त्यामध्ये रु.१०,०००/– अनुदानाचा समावेश आहे.
- अर्जदाराचा सहभाग प्रकल्प मर्यादा ५% टक्के आहे.
- कर्जाची परतफेड ५ वर्षामध्ये मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

#### इ) उच्च शैक्षणिक कर्ज योजना – (ELS)

- एनएसफएसडीसी योजनेअतर्गत व्यवसायिक व तांत्रिक उच्च शिक्षणाकरिता देशाअंतर्गत कर्ज मर्यादा रु.१०,००,०००/– पर्यंतचे प्रावधान आहे व देशाबाहेर कर्ज मर्यादा रु.२०,००,०००/– चे प्रावधान आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज मर्यादा व्याज दर द.सा.द.शे. ४%, स्त्री लाभार्थीकरिता द.सा.द.शे. ३.५% व्याज दर आकारावयाचा आहे.
- अर्जदाराच्या कुटुंबातील वार्षिक उत्पन्न मर्यादा ३,००,०००/– इतकी आहे.

### ५) राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना – (एन.एस. के.एफ.डी.सी.)

केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर, अस्वच्छ काम करणाऱ्या सफाई कामगारांचे व त्यांचेवर अवलंबून असलेल्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याकरिता राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली आहे. त्यात विविध व्यवसाय करण्यासाठी रु. १० लाख कमाल मर्यादेपर्यंत कर्ज देण्यात येते.

**अ) मुदती कर्ज योजना –**

अ) प्रकल्प मर्यादा रु. १५ लाख.

ब) केंद्रीय महामंडळातर्फे देण्यात येणाऱ्या कर्जावर ६ % व्याज आकारले जाते.

क) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

ड) कर्जाची परतफेड १० वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ब) सूक्ष्मपत पुरवठा– (एम. सी. एफ.)**

या योजनेअंतर्गत रु. ६०,०००/– पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्पाच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणून घेण्यात येते. व्याजदर ५ % आकारण्यात येत असून कर्जाची परतफेड ३ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**क) महिला समृद्धि योजना (एम.एस. वाय.)**

महिलांना या योजनेअंतर्गत रु.६०,०००/– पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प किमतीच्या १०% अर्जदाराचा सहभाग असतो. व्याज दर ४% आकारण्यात येत असून कर्जाची परतफेड ३ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ड) महिला अधिकारिता योजना– (एन. एस.के.एफ.डी.सी) (एम.ए.वाय.)**

महिलांना या योजनेअंतर्गत रु. १,००,०००/– पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्पाच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणून घेण्यात येते. व्याजदर ५% आकारण्यात येत असून कर्जाची परतफेड ३ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**इ) शैक्षणिक कर्ज (ई.एल.एस.)**

एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्यामार्फत व्यावसायिक व तांत्रिक उच्च शिक्षणाकरिता देशात तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. सदर योजनेअंतर्गत देशाअंतर्गत उच्च शिक्षण घेण्याकरीता रु. १०.०० लाखापर्यंत कर्ज देण्याचे प्रावधान आहे, तसेच देशाबाहेर रू. २०.०० लाखापर्यंत कर्ज देण्याचे प्रावधान आहे. व्याजदर द.सा.द.शे. ४% आकारावयाचा आहे. तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ३.५% व्याजदर आकारावयाचा आहे.

**अर्ज करण्यास आवश्यक पात्रता –**

(१) अर्जदार अनुसूचित जाती/नवबौद्ध संवर्गातील असावा व त्याचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे.

(२) राज्य महामंडळाच्या योजनेकरिता वार्षिक उत्पन्न मर्यादा शहरी व ग्रामीण भागाकरिता रुपये १ लाख असावी.

(३) केंद्रीय महामंडळाच्या योजनेकरिता वार्षिक उत्पन्न रु. ३,००,०००/– लाख इतकी आहे.

(४) एनएसकेएफडीसी या योजनेअंतर्गत अर्जदाराने सफाई कामगार कुटुंबातील असल्याचा दाखला द्यावयाचा आहे. अर्ज करण्याकरिता जातीची व उत्पन्नाची अट नाही.

(५) अर्जदार हा महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा (राज्य / केंद्र) थकबाकीदार नसावा.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे–**

(१) जातीचा व उत्पन्नाचा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला दाखला

(२) २ पासपोर्ट आकाराचे फोटो

(३) रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, आधारकार्ड प्रत

(४) कोटेशन, व्यवसायासाठी आवश्यक असल्यास जागेचा पुरावा, व्यवसायानुरुप इतर आवश्यक दाखले

(५) आवश्यकतेप्रमाणे प्रकल्प अहवाल

(६) व्यवसायानुरुप आवश्यकतेप्रमाणे इतर दाखलेपत्र, उदा. वाहनाकरिता व व्यवसायाकरिता लायसन्स, परमिट, बॅज नंबर इत्यादी

(७) जनधन योजनेचे खाते क्रमांक व पासबुकची झेरॉक्स

# प्रादेशिक व जिल्हा कार्यालय, मुंबई

**प्रादेशिक कार्यालय : मुंबई**
महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.
२ रा मजला, ठाकरसी हाऊस, विदेशी टपाल कार्यालयाजवळ, शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ००१
फोन : ०२२-२२६२१९३१/२२२६२१९३४/३५११५८८३

**जिल्हा कार्यालय: मुंबई शहर व मुंबई उपनगर**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.
गृह निर्माण भवन , तळमजला, रुम नं ३५, कलानगर उपनगर, बांद्रा (पुर्व), मुंबई-४००१ ०५१
फोन : ०२२- २६५९२६४० (मुंबई उपनगर), ०२२-२६५९९८९५ (मुंबई शहर)

**जिल्हा कार्यालय : ठाणे**
जिल्हा व्यवस्थापक,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.
जिल्हाधिकारी कार्यालय, ५ वा मजला, कोर्ट नाका, ठाणे (प.). फोन : ०२२-२५४०८४७८

**जिल्हा कार्यालय: रायगड**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.
अनंत निवास, पहिला मजला, सेंट मेरी शाळेजवळ, चेंढेरे, अलिबाग, जि. रायगड-४०१ २०१. फोन : ०२१४१- २२४३०७

**जिल्हा कार्यालय: पालघर**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. 'बी' विंग, २०७, दुसरा मजला, आफ्रीन अपार्टमेंट, विक्रीकर कार्यालयाच्या बाजूला, नवली, जि.पालघर (पु.). फोन : ०२५२५- २५७९९७

**जिल्हा कार्यालय: रत्नागिरी**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला, कुवारबाव, जि. रत्नागिरी-४१५ ६१२. फोन : ०२३५२-२३०९५७

**जिल्हा कार्यालय : सिंधुदुर्ग**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 'अ' बिल्डिंग, सिंधुदुर्ग नगरी, ओरस, ता. कुडाळ, जि.सिधुदुर्ग
फोन : ०२३६२-२२८०३९ फॅक्स : ०२३६२- २२८०६३

# प्रादेशिक व जिल्हा कार्यालय, पुणे

**प्रादेशिक कार्यालय : पुणे**
महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.
सेंट्रल बिल्डींग, दक्षिण बाजु, दुसरा माळा, जि. पुणे-४११ ०११. फोन : ०२०-२६१२६९२९

**जिल्हा कार्यालय : पुणे**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सर्वे नं. १०३/१०४, मेंटल कॉर्नर, विश्रांतवाडी, पोलीस स्टेशन समोर, येरवडा, पुणे-४११०१५. फोन : ०२०-२९७०३०५८

**जिल्हा कार्यालय : सातारा**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या.
६५ पालकर बिल्डीग, दुसरा माळा, मल्हार पेठ, जि. सातारा-४१५ ००१. फोन: ०२१६२-२३९०३९ फॅक्स: ०२१६२-२३९९१६

**जिल्हा कार्यालय: सांगली**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुना बुधगांव रोड, रेल्वे क्रॉसिंग जवळ, संभाजी नगर सांगली - ४१६५१६ फोन: ०२३३-२३२५६५९

**जिल्हा कार्यालय : सोलापुर**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, दुसरा मजला, सात रस्ता, गर्व्हमेंट रेस्ट हाऊस जवळ,जि. सोलापूर ४११ ००१. फोन : ०२१७-२३१७०१२

**जिल्हा कार्यालय : कोल्हापूर**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, राजेश मोटर्स समोर, विचारे माळ ३रा मजला, कोल्हापूर ४१६ ००६. फोन: ०२३१-२६६३८५३ फॅक्स: २५३९०९९

# प्रादेशिक व जिल्हा कार्यालय, नाशिक

**प्रादेशिक कार्यालय : नाशिक**
महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. बाफना बिल्डींग प्लॉट नं.४, शिवाजीनगर, मुंबई पुणे नाशिक रोड,
जि. नाशिक-४२२२०२. फोन : ०२५३-२४१२१६८

**जिल्हा कार्यालय : नाशिक**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नासर्डी पुलाजवळ, पुणे नाशिक रोड-४२२ ००६ फोन : ०२५३-२२३६४१०

**जिल्हा कार्यालय : धुळे**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिंचन भवन मागे, साक्री रोड, जि. धुळे- ४१४ ००१ फोन: ०२५६२-२७६१४३ फॅक्स: २८६८९८

**जिल्हा कार्यालय : जळगांव**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, महाबळ, हातनूर कॉलनी, मायादेवी स्टॉपसमोर, जि. जळगाव-४२५ ००१ फोन : ०२५७-२२६२९५१

**जिल्हा कार्यालय : अहमदनगर**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. १२३ वी हालिमा मेन्शन, मनिष मोटर्स समोर, कोठला रोड, सर्जेपुरा, जि. अहमदनगर- ४१४ ०३३ फोन :०२४१-२३२३८१४

**जिल्हा कार्यालय : नंदूरबार**
जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, टोकर तलाव रोड, नविन जिल्हा परिषद समोर, जि. नंदूरबार ४२५४१२. फोन: ०२५६४-२१००६६

**आवाहन : वरील योजनांचा गरजवंतानी लाभ घ्यावा. तसेच ठरवून दिलेल्या समान हप्त्याप्रमाणे वसुली नियमित भरावी.**

# प्रादेशिक व जिल्हा कार्यालय, औरंगाबाद

**प्रादेशिक कार्यालय : औरंगाबाद**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., प्लॉट क्र. ४, एनएस–४, सिडको एन –४, पुंडलिक नगर, तिसरा मजला, पाण्याच्या टाकीजवळ, सेवालाल महाराज चौक, एसबीआय बँकेजवळ ,औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद– ४३१००१.
फोन: ०२४०–२३३१८३३

**जिल्हा कार्यालय : औरंगाबाद**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा, शिवाजी हायस्कुलच्या बाजुला, शासकीय दुध डेरीच्या पाठीमागे, जि. औरंगाबाद– ४३१ ००१ फोन: ०२४०–२४८६०७१

**जिल्हा कार्यालय : परभणी**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, जायकवाडी वसाहत, परभणी जि. परभणी– ४३१२०३ फोन : ०२४५२–२२०७८३

**जिल्हा कार्यालय : उस्मानाबाद**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, प्रशासकीय इमारत, तळमजला, जि. उस्मानाबाद– ४३१५०१. फोन : ०२४७२–२२३४८७

**जिल्हा कार्यालय : बीड**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तहसील कार्यालयाजवळ, बीड– ४३१ १२२ फोन : ०२४४२– २२२६१४

**जिल्हा कार्यालय : नांदेड**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नमस्कार चौक, पुर्व बायपास रोड, ज्ञानमाता शाळेसमोर, नांदेड, जि. नांदेड–४३१ ६०५. फोन : ०२४६२–२२०१४८

**जिल्हा कार्यालय : जालना**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जि. जालना– ४३१ २०३ फोन : ०२४४२ – २२४९०४

**जिल्हा कार्यालय : लातुर**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, डालडा फॅक्टरी, शिवनेरी गेट समोर, लातुर जि. लातुर– ४३१ ५२१. फोन : ०२३८२–२५२८००

**जिल्हा कार्यालय : हिंगोली**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, रिसाला बाजार, सरकारी दवाखाना जवळ, हिंगोली जि. हिंगोली – ४३१ ५१३. फोन: ०२४५६–२२३९४४

# प्रादेशिक व जिल्हा कार्यालय, अमरावती

**प्रादेशिक कार्यालय : अमरावती**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विशेष पोलीस महासंचालक, कार्यालयामागे,चांदुर रेल्वे रोड, जि. अमरावती ४४४ ६०१ फोन: ०७२१–२६६२९१२

**जिल्हा कार्यालय : अमरावती**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विशेष पोलीस महासंचालक कार्यालयामागे चांदूर रेल्वे रोड, जि. अमरावती ४४४६०१ फोन : ०७२१–२६६५९९३

**जिल्हा कार्यालय : बुलढाणा**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, त्रिशरण चौक, चिखली रोड, बुलढाणा, जि. बुलढाणा–४४३००१. फोन: ०७२६२–२४२२८०

**जिल्हा कार्यालय : यवतमाळ**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पोलिस वसाहतजवळ, दक्षता भवनाच्या मागे, जि. यवतमाळ–४४५००१ फोन :०७२३२–२४३३९४

**जिल्हा कार्यालय : अकोला**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्य. द्वारा डी. के. साठे, भागवत प्लॉट, मोहन भाजी भंडार चौक, तापडिया नगर, जि. अकोला–४४४००१ फोन : ०७२४–२४२६६२१

**जिल्हा कार्यालय : वाशिम**

जिल्हा व्यवस्थापक महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नालंदा नगर, चिखली रोड, जि. वाशिम–४४४५०५ फोन: ०७२५२–२३१२६७

# प्रादेशिक व जिल्हा कार्यालय, नागपूर

**प्रादेशिक कार्यालय नागपूर**

३०१–ए विंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय आय. आय.टी. समोर, दिक्षाभुमी रोड, राणाप्रतापनगर, नागपूर ४४००२२. दूरध्वनी /फॅक्स क्र. ०७१२–२२३९९१०

**जिल्हा कार्यालय : नागपूर**

जिल्हा व्यवस्थापक, ३०१–ए विंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय आय. आय.टी. समोर, दिक्षाभूमी रोड, राणाप्रतापनगर, नागपूर ४४००२२. दुरध्वनी/फॅक्स क्र. ०७१२–२२३८६५५

**जिल्हा कार्यालय : वर्धा**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सेवाग्राम रोड, जि. वर्धा– ४४२००१. फोन: ०७१५२–२४३६२८ फॅक्स: २४२११७

**जिल्हा कार्यालय: भंडारा**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हा परिषद चौक, सिव्हील लाईन, भंडारा ४४१ ९०४. फोन: ०७१८४–२५२७०९

**जिल्हा कार्यालय : चंद्रपूर**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय , जलनगर, रयतवाडी, रोड, शासकीय दुध डेअरी कार्यालया समोर, जि. चंद्रपूर–४२२ ४०१. फोन : ०७१७२– २५३५४९

**जिल्हा कार्यालय : गडचिरोली**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चंद्रपूर रोड, आरटीओच्या मागे, पाण्याच्या टाकीजवळ, जि. गडचिरोली–४४२ ६०५ फोन : ०७१३२–२२२०१०

**जिल्हा कार्यालय : गोंदिया**

जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या सामाजिक न्याय व सेवा केन्द्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, आमगांव रोड, जि. गोदिंया ४४१ ६०१ फोन : ०७१८२–२३२९४७

**टीप: अधिक माहितीकरीता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये महामंडळाची कार्यालये कार्यरत आहेत.**